महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८
(सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

(अ) अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)

(१) **श्री. राहुल कुल, वि.स.स.**

"दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अंगणवाडी बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत" या विषयावरील **श्री.राहुल कुल व इतर वि.स.स** यांचा दिनांक २० जुलै, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४५५ मधील प्रश्न क्रमांक ११५२१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. संदीप नाईक, वि.स.स.**

"नवी मुंबईत सिडको निर्मित कंडोमिनियम अंतर्गतची विकासकामे करण्यास परवानगी मिळणेबाबत" या विषयावरील **श्री.संदीप नाईक व इतर वि.स.स** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १२६४१६ ला दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. संजय कदम, वि.स.स.**

"केंदूर-भोसूरस्थळ (ता.शिरुर, जि.पुणे) रस्ता जागेच्या हद्दी व सीमारेषा निश्चित न करता तयार करण्यात येत असल्याबाबत" या विषयावरील **श्री.संजय कदम, वि.स.स** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११८८७६ ला दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)

(१) श्री.राजु तोडसाम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथे सामाजिक न्याय भवनाच्या नवीन इमारत समोरील खोदलेल्या खड्ड्यात बुडून तीन बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये उघडकीस येणे, कंत्राटदाराने त्यांच्या कामाकरिता बेकायदेशीर १८ फुटांचा खड्डा खोदून ठेवणे, सदर खड्ड्याच्या आजूबाजूला कोणतेही संरक्षण भिंत किंवा साधे कुंपण बांधलेले नसणे, सदर प्रकरणी पालकांनी पांढरकवडा पोलीस स्टेशनमध्ये संबंधिताविरुद्ध तक्रार दाखल केली असतानाही पोलिसांनी गुन्ह्यामध्ये जाणीवपूर्वक कलम ३०४ अन्वये गुन्हा नोंद करून गंभीर प्रकरणाला किरकोळ प्रकरण बनविणे, सदर खड्ड्यात कोणी पडल्यास मृत्यू होऊ शकतो हे ज्ञात असूनही कंत्राटदार कंपनीने खड्डा न बुजवता तसाच ठेवल्यामुळे लहान मुलांचा जीव जाणे, त्यामुळे सदर कंपनीच्या मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची पालकांनी केलेली मागणी, परंतु अद्यापही कंत्राटदारांविरुध्द कोणतीच कारवाई झालेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने उक्त प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

(२) सर्वश्री. योगेश सागर, अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री.अमित साटम, अस्लम शेख, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, कुणाल पाटील, भारत भालके, अमर काळे, अमित देशमुख, डी.पी. सावंत, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. वसंतराव चव्हाण, अबु आझमी, जितेंद्र आव्हाड, विश्वजित कदम, सुनिल केदार, अमिन पटेल, मो.आरिफ नसीम खान, डॉ.संतोष टारफे, ॲड.यशोमती ठाकूर, श्री.त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-

" मुंबईमध्ये पाण्याचे वाटप लोकसंखेच्या आधारावर करणे आवश्यक असताना सुध्दा याकडे मुंबई महापालिका प्रशासन करत असलेले दुर्लक्ष. महापालिकेच्या म्हणण्यानुसार तळमुंबई शहराची लोकसंख्या ३१ लाख असताना मुंबई शहरात ३७५० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा होत असणे, पाणी कपातीचे वेळी सुध्दा तळमुंबई शहरास एकंदर ३२५० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाण्यामधून ९७५ एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा होत असणे, महापालिकेच्या म्हणण्यानुसार ३० लाख लोकसंख्या असलेल्या पूर्व उपनगरातील लोकांना एकंदर ३७५० एमएलडी (दशलक्ष लिटर) मधून ११३०

एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा होत असणे, पाणी कपाती नंतर एकंदर ३२५० एमएलडी (दशलक्ष लिटर) पैकी पूर्व उपनगरास ९३० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा होत असणे, महापालिकेच्या म्हणण्यानुसार ५५ लाख लोकसंख्या असलेल्या गोरेगाव ते दहिसर या परिसरातील पश्चिम उपनगरातील लोकांना एकंदर ३७५० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठ्यामधून १५०० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा होत असणे, तोच कपाती नंतर १३०० एमएलडी (दशलक्ष लिटर) एवढा पाणीपुरवठा होत असणे, परंतु सध्या केवळ ७०० एमएलडी पाणीपुरवठा होत असणे, उपनगरातील एच व के विभाग (पूर्व/पश्चिम) या चार विभागात एकूण २४ लाख लोकसंख्या असून त्यांना सध्या ८३० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणीपुरवठा करण्यात येत असणे, सदर प्रकरणी यापुर्वी शासनाने समिती नेमलेली असून देखील पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, सध्य:स्थितीत मुंबईकरांना दररोज ४५०० दशलक्ष लिटर पाण्याची गरज असताना शहरास दररोज ३८०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येणे, सध्या महापालिका प्रशासनाने १० टक्के पाणी कपात व १५ टक्के वेळ कपात सुचविली असणे, मुंबई शहरामध्ये पाण्याची गळती व पाणी चोरी होऊन दररोज ७९० दशलक्ष लिटर पाणी वाया जात असल्याचे महापालिका प्रशासनाने कबुल केले असून गळतीचे प्रमाण हे एकूण पाणी पुरवठ्याच्या २५ टक्के असल्याचे निदर्शनास येणे, वाया जाणारे पाणी व चोरी होणारे पाणी थांबविण्याऐवजी महापालिका मुंबईकरांचे पाणी कपात करीत असणे, आधीच पाणी कमी येत असल्यामुळे मुंबईकर नागरिक त्रस्त झाला असून पालिका प्रशासनाने आणखीन पाणी कपात केल्यास जनतेमध्ये क्षोभ निर्माण होण्याची शक्यता असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(३) प्रा.विरेंद्र जगताप, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. रणजीत कांबळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास अध्यक्ष, जिल्हा परिषद, अमरावती यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत विभागीय आयुक्त यांचेकडे केलेली लेखी तक्रार, सर्वसाधारण सभेमध्ये ठराव नामंजूर असताना सदर अधिकाऱ्यांने मनमानीपणे कामांची देयके अदा करणे, सर्वसाधारण सभेमध्ये को.प. बंधारा फुबगाव (ता. नांदगाव खडेश्वर) चे काम ठेव तत्वावर देण्याचा ठराव झाला असताना मनमानीपणे संबंधीत यंत्रणेला निधी देण्यास टाळाटाळ करून विकास कामे प्रलंबीत ठेवणे, विभागांतर्गत लेखे अद्ययावत ठेवण्यास दिरंगाई करणे, कर्मचाऱ्यांना विलंबाने भविष्य निर्वाह निधी देणे, लेखा आक्षेप जि. प. समिती सभेसमोर न ठेवणे, सभेने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन करून अडवणुकीचे धोरण अवलंबिने, सदर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या मनमानी कामामुळे जिल्ह्यातील प्रशासकीय व विकास कामावर अत्यंत विपरीत परिणाम होणे, परंतु अद्यापही संबंधीतांवर कोणतीही कारवाई करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची

भूमिका."

(४) **सर्वश्री. अमिन पटेल, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, कालीदास कोळंबकर, मो. आरिफ नसीम खान, विजय वडेट्टीवार, अमित देशमुख, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ. संतोष टारफे, श्री. कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. भारत भालके, अमित झनक, बसवराज पाटील, शेख आसिफ शेख रशीद, त्र्यंबकराव भिसे, डी. पी. सावंत, हर्षवर्धन सपकाळ, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील जे.जे.रुग्णालयात देशविदेशातून व राज्यातील बहुतांशी भागातून हजारो रुग्ण रोज येत असून जे. जे. रुग्णालयात डॉक्टर, नर्सेस व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने या रुग्णालयामध्ये डॉक्टारांवर व कर्मचाऱ्यांवर पडत असलेला ताण, या रुग्णालयात मधुमेह, उच्च रक्तदाब, अतिसार, ॲसिडीटी इत्यादी आजारावरील औषधे उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांना बाहेरुन औषधे आणावी लागत असणे, रुग्णालयांत शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्यही उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक दिवसांपासून थांबलेल्या शस्त्रक्रिया, औषधे खरेदी करण्यासाठी हाफकिण बायोफार्मा कॉर्पोरेशनकडे सक्षम यंत्रणा नसल्यामुळे उक्त रुग्णालयांमध्ये औषधांचा व शस्त्रक्रियेच्या साहित्याचा तुटवडा निर्माण होत असणे, या प्रकारांमुळे डॉक्टर व रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये तणाव निर्माण होऊन डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यामध्ये झालेली वाढ, जे. जे. रुग्णालयामध्ये सुपर स्पेशालिस्ट हॉस्पीटल सुरु करण्याबाबत प्रस्तावाला मान्यता देण्यात आली असणे, परंतू गत ४ वर्षात सुपर स्पेशालिस्ट हॉस्पीटल सुरु करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, मुंबईतील जे.जे. रुग्णालयामध्ये गैर संक्रमणीय रोग, मानसिक आरोग्य, न्युरोसायन्सेस जीनोमिक्स आणि विषाणू यांवर अभ्यास करण्यासाठी विकसीत करण्यात येणाऱ्या संधोधन केंद्रासाठी जे.जे. रुग्णालयाशेजारील रिचर्डसन आणि क्रुडास या इंजिनिअरींग कंपनीची ५४,२८५ वर्ग मीटर जमीन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणे, अद्याप उक्त प्रस्ताव प्रलंबित असणे, या रुग्णालयात आधुनिकीकरण करुन याठिकाणी आयसोलेशन युनिट, ऑडीटोरियम उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव असूनही अद्याप त्याबाबत कोणतीच मंजूरी देण्यात न येणे, मुंबईत येणाऱ्या महत्वाच्या, अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या उपचाराकरीता जे. जे. रुग्णालयातील डॉक्टरांना जावे लागत असल्याने तेथील ५ डॉक्टरांवर ताण येत असून यासाठी मुंबईतील सायन, नायर, कुपर व के.ई.एम. रुग्णालय इत्यादी रुग्णालयातील डॉक्टरांना अशा व्यक्तींच्या उपचारांची जबाबदारी देण्याची होत असलेली मागणी, जे. जे. रुग्णालयामध्ये कार्डीयाक रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने २४ तास कार्डीयाक रुग्णवाहिका उपलब्ध करण्याची गरज, तसेच जे. जे. रुग्णालय, जी. टी. रुग्णालय, कामा रुग्णालयांमध्ये २५० खाटांचे कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याबाबत अनेकदा मागणी करण्यात येऊनही अद्याप याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नसणे, या सर्व सुविधा

उपलब्ध करण्याची गरज असतानाही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन जे.जे रुग्णालयाचे आधुनिकीकरण करुन जागतिक दर्जा देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभू, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, अस्लम शेख, मो. आरिफ नसीम खान, डॉ. संतोष टारफे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. त्र्यंबकराव भिसे, कुणाल पाटील, मंगेश कुडाळकर, सुनिल शिंदे, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. पंकज भुजबळ, छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, अनिल कदम, प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात यावर्षी पाऊसमान कमी राहिल्याने पोळ कांद्याच्या उत्पादनास मोठा फटका बसणे, पावसाचे आगमन लांबल्याने उन्हाळी कांद्याचे दर मोठया प्रमाणात वाढणे, प्रती क्विंटल सरासरी २१०० रुपयांचा टप्पा गाठणारा कांदा सध्या प्रती क्विंटल १६०० रुपयावर असतांना नवीन कांदा बाजारात न आल्याने साठविलेल्या उन्हाळी कांद्यावर अवलंबून राहावे लागणे, परंतू कांदा साठवणूकीमुळे वजनात घट, निकृष्ट दर्जाचा माल यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणे, असे संकट असतांनाही केंद्र शासनाने कांद्याचे भाव स्थिरिकरण निधी अंतर्गत खरेदी केलेल्या कांद्यासमोर पेच निर्माण होणे, बाजारातील कांद्याची घसरण रोखणे व दरवाढ नियंत्रित ठेवण्यासाठी महानगरात कांदा पुरविण्याच्या उद्देशाने नाफेडच्या मदतीने केंद्र शासनाने नाशिक, नगर, सोलापूर या भागातून माहे एप्रिल ते माहे जून या कालावधीत उन्हाळी कांद्याची केलेली खरेदी, २५ हजार मेट्रीक टन कांदा साठवणूकीसाठी पुरेशा चाळी न मिळाल्याने नाफेडला ११ मेट्रीक टन खरेदीवर समाधान मानावे लागणे, परिणामी कांद्याचे दर आवाक्याबाहेर वाढल्याने व हजारो टन कांदा खराब झाल्याने जनतेला चढ्या दराने कांदा घ्यावा लागत असल्याने त्यांच्यात वाढता असंतोष, शासनाने कांद्याचे वाढते दर आटोक्यात आणून स्वस्त दरात कांदा उपलब्ध करुन देण्याकरिता करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.''

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री : **"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप मिळाली नसल्याबाबत"** या विषयावरील श्री.अनिल बाबर व इतर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५३२१ ला दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

दोन : शोक प्रस्ताव -

श्री.सुभाषचंद्र नारायणराव कारेमोरे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री : (क) राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती तसेच इतर संलग्न बाबींबाबत दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी प्राप्त अहवालातील निष्कर्ष व अंतिम शिफारशींचा सारांश तसेच शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ च्या कलम १५ अन्वये सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचा अनुक्रमे अकरावा, बारावा व तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा सेहेळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **कृषी मंत्री**	:	महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० प्रसिध्द करणारी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१० रोजीची अधिसूचना क्रमांक बियाणे २००९/सीआर-४/१-अे सभागृहासमोर ठेवतील.
(३) **नियोजन मंत्री**	:	विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(४) **सांस्कृतिक कार्य मंत्री**	:	महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.
(५) **संसदीय कार्य मंत्री**	:	विधानसभेच्या सन २०१८ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ४ जुलै, २०१८ ते दिनांक २० जुलै, २०१८ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण १२१ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१८ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ५०५ आश्वासनांच्या पूर्ततेची विविरणपत्रे यादीसह, सभागृहाच्या पटलावर ठेवतील.
(६) **वैद्यकीय शिक्षण मंत्री**	:	महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वार्षिक लेखे व सन

२०१७ या वर्षाचा एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(७) उद्योग मंत्री

(क) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१६-२०१७ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(८) पणन व वस्त्रोद्योग मंत्री :

(क) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकोणसाठावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल (S.A.R.) सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवतील.

चार : पंचायती राज समितीचा अठरावा, एकोणीसावा, विसावा व एकविसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

पाच : विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीचा (२०१७-२०१८) नववा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे.

सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

सात : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८.

(२) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - विजयभूमी विद्यापीठ, रायगड

विधेयक, २०१८.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमिन पटेल, जयंत पाटील, छगन भुजबळ, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, हर्षवर्धन सपकाळ, भारत भालके, शशिकांत शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब पाटील, हनुमंत डोळस, पंकज भुजबळ, श्रीमती दिपीका चव्हाण, श्री.सुरेश लाड, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री हसन मुश्रीफ, दिपक चव्हाण, वैभव पिचड, दत्तात्रय भरणे, राजेश टोपे, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री.संदिप नाईक, राहुल मोटे, श्रीमती ज्योती कलानी, सर्वश्री प्रदिप नाईक, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २५ — महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, वसंतराव चव्हाण, अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, विजय वडेट्टीवार, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ

पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, श्री.वसंतराव चव्हाण, ॲड.त्र्यंबक भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, श्री.वसंतराव चव्हाण, ॲड.त्र्यंबक भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(क) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-

सन २०१८ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८.

(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : **डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री सुनिल प्रभू, राजेंद्र पाटणी, सुभाष साबणे, प्रशांत बंब, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्री. बाबुराव पाचर्णे, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री. सुरेश धानोरकर, सुरेश खाडे, राजाभाऊ वाजे, पास्कल धनारे, किशोर पाटील, अनिल गोटे, राजेश क्षीरसागर, संजय सावकारे, प्रकाश आबिटकर, उदेसिंग पाडवी, मनोहर भोईर, विजयकुमार गावित, राहुल पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री ज्ञानराज चौगुले, शिवाजीराव कर्डिले, योगेश घोलप, संतोष दानवे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री अतुल सावे, अनिल कदम, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री. वैभव नाईक, सुधाकर भालेराव, उल्हास पाटील, हरिष पिंपळे, अनिल बाबर, गोवर्धन शर्मा, शंभुराज देसाई, चैनसुख संचेती, प्रा. चंद्रकांत सोनवणे, सर्वश्री.लखन मलिक, प्रतापराव पाटील-चिखलीकर, रमेश बुंदिले, हेमंत पाटील, किर्तीकुमार भांगडिया, नाना शामकुळे, सुधाकर देशमुख, डॉ.पंकज भोयर, सर्वश्री. धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, उन्मेश पाटील, बाळासाहेब सानप, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रणधीर सावरकर, राजू तोडसाम, प्रा. डॉ. अशोक उईके, सर्वश्री. समीर कुणावार, समीर मेघे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री तान्हाजी मुटकुळे, लक्ष्मण जगताप, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. मोहन फड, विनायकराव जाधव-पाटील, डॉ.मिलिंद माने, श्री. सुरेश भोळे, श्रीमती स्नेहलता कोल्हे, ॲड आकाश फुंडकर, श्रीमती मोनिका राजळे, श्री.राजेंद्र नजरधने, ॲड लक्ष्मण पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री संजय भेगडे, अमल महाडिक, शिवाजीराव नाईक, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये राज्यातील २६ जिल्हयांमध्ये गंभीर दुष्काळ व ११२ तालुक्यामध्ये मध्यम दुष्काळ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ पासून राज्य शासनाने घोषित केला असणे, दुष्काळाचे नैसर्गिक संकट दूर करण्याच्या दृष्टीने व दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याकरिता राज्य शासनाकडून मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात आली असणे, मा. मुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील त्यांच्या अनेक सहकारी मंत्र्यांनी दुष्काळी भागाचा दौरा करुन व स्थानिक प्रशासनाकडून तेथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करुन दुष्काळाचा

सामना युध्दपातळीवर करण्याच्या दृष्टीने प्रशासनास दुष्काळ निवारण्याची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याकरिता आदेश देण्यात आले असणे, दुष्काळ निवारण्याकरिता केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचे शासनाचे प्रयत्न असणे, केंद्राच्या 'नॅशनल सेंटर फॉर क्रॉप फोरकास्टींग' या संस्थेकडून राज्यातील सर्व गावांतील पाण्याची सद्यस्थिती, पाण्याची पातळी, पिकांची परिस्थिती इत्यादी सर्व बाबींचे उपगृहाच्या माध्यमातून सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे दुष्काळ निवारण्याचे कार्य कार्यान्वित करण्यात आले असणे, राज्यातील २० हजार गावांमध्ये पिकांची आणेवारी सरासरी ५० पैशांपेक्षा कमी असून सुमारे २०० तालुक्यांवर दुष्काळाचे सावट असणे, विशेषत: मराठवाडयात अत्यल्प पाऊस झाल्याने मराठवाडयातील ८ हजार ५२५ गावांपैकी ३ हजार ५७७ म्हणजे ४२% गावांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असणे, शासनाव्दारे मराठवाडयातील दुष्काळी पट्टयासाठी सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येणे, मराठवाडयात जलयुक्त शिवाराची कामे मोठया प्रमाणावर होऊनही त्या भागात पाऊस न झाल्याने व त्यामुळे जलयुक्त शिवारामध्ये पाणी जमा होऊ न शकल्याने त्या भागात पाण्याची भीषण समस्या निर्माण होणे, राज्याच्या विविध भागातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती, भूजल पातळी आदींची माहिती एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण करण्यासाठी व त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून 'महामदत' या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात येणे, राज्यातील आत्महत्याग्रस्त दुष्काळी जिल्हयांकरिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेंतर्गत ३०० कोटींच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मंजुरी देण्यात येऊन तो कार्यान्वित केला असणे, या प्रकल्पांतर्गत मराठवाडा व विदर्भातील क्षारयुक्त जमीन असणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी आणि गावातील जमिनीचे मृद संवर्धन करण्यासाठी नियोजन करण्यात येणे, दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यामध्ये जमीन महसुलातून सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषीपंपाच्या चालू बिलामध्ये ३३.५% सुट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, एस.टी. प्रवास सवलत, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर व टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतपंपाची विज जोडणी खंडित न करणे इ. बाबी राज्य शासनाकडून जाहीर झाल्या असणे, नैसर्गिक असमतोलपणामुळे राज्यात निर्माण होणाऱ्या दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी व शेतकऱ्यांना कर्ज घेण्याची आवश्यकता न पडता त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाकडून दुरगामी धोरण आखण्यात येणे, जलयुक्त शिवाराची संकल्पना अंमलात आणून राज्यातील बहुतांश भागातील पाण्याचे दुर्भिक्ष कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न, दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना अधिकाधिक सोयी-सुविधा देण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.''

(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

नऊ : **सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, गणपतराव देशमुख, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, श्री जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड॰ यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, डॉ. मधुसूदन केंद्रे, सर्वश्री. राहुल जगताप, अमिन पटेल, डि. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. प्रदिप जाधव-नाईक, कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, विश्वजित कदम, संदिप नाईक, दिपक चव्हाण, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, सुरुपसिंह नाईक, पंकज भुजबळ, सुरेश लाड, ॲड॰ के. सी. पाडवी, श्रीमती सुमन पाटील, श्री.बबनराव शिंदे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"वेधशाळेचे मान्सुनबाबत चुकलेले भाकित, तद्वतच संपूर्ण राज्यात सरासरीपेक्षा कमी झालेले पर्जन्यमान, पावसात पडलेला खंड आणि परतीच्या पावसाने दिलेली हुलकावणी यामुळे मराठवाड्यासह, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र तसेच खान्देश परिसरातील २५० पेक्षा जास्त तालुक्यात पडलेला भीषण दुष्काळ व त्यामुळे राज्यातील जलाशये कोरडी पडणे, खरीपाची पिके उध्वस्त होऊन रब्बीचीही आशा मावळणे, पिकावर मोठ्या प्रमाणात झालेला किडीचा प्रादुर्भाव, दुष्काळ जाहीर करताना अवर्षणप्रवण तालुकेच दुष्काळाच्या यादीतून वगळले जाणे, तसेच विविध जाचक अटींमुळे राज्यातील जनता नुकसान भरपाईपासून वंचित राहणे, दुष्काळासंदर्भात जाहीर केलेल्या उपाययोजना सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसणे, पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचे व चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत कोणतेही नियोजन नसणे, पाणी पुरवठा करणाऱ्या नळ योजनांसाठी अखंडित वीज पुरवठा करण्याची आवश्यकता, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या मंजूर आराखड्यातील नळ पाणीपुरवठा योजनांची कामे त्वरीत सुरु करणे, "मागेल त्याला काम" या योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, आदिवासी व डोंगरी भागात शिवकालीन खडकातील टाक्या ही योजना पूर्ववत सुरु करण्याची आवश्यकता, आदिवासी भागात राबविल्या जाणाऱ्या पडकई योजनेचा पुर्ववत राज्य योजनेमध्ये समावेश करुन स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, तसेच गॅस कनेक्शन उपलब्ध असलेल्या लाभार्थ्यांना शिधा पत्रिकेव्दारे रॉकेल

व पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करुन देऊन स्थलांतर थांबविण्याची आवश्यकता, दुष्काळाने होरपळणाऱ्या ४२ लाख शेतकऱ्यांवरील कृषी पंपाच्या थकबाकीचा डोंगर १२ हजारवरुन ३० हजार कोटींवर पोहचणे, शासनाने जाहीर केलेली सोलर पंप योजना अद्याप अस्तित्वात न येणे, जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून ८ हजार कोटींचा खर्च होऊनही सुमारे २५० तालुक्यातील जलपातळी १ ते ३ मीटरपर्यंत घटणे, जलयुक्तशिवार, जलसंधारण, मृदसंधारणांच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, पावसाळ्यापासूनच टँकर्सची मोठ्या प्रमाणात होत असलेली मागणी, माहे जून २०१७ मध्ये जाहीर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ राज्यातील असंख्य पात्र शेतकऱ्यांपर्यंत न पोहचणे, मागील दोन खरीप हंगामासाठी ४७ टक्के व ४२ टक्के इतक्या तुटपुंज्या पीक कर्जाचे झालेले वाटप, पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची झालेली फसवणूक, पावसाअभावी खरीपाचे वाया गेलेले पीक, रब्बीचे पेरे होणार नसल्यामुळे पर्यायाने दोन्ही हंगामासाठी सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये तर फळबागांच्या नुकसानी पोटी हेक्टरी १ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, शेतमालाचा जाहीर केलेला हमी भाव अद्यापही शेतकऱ्यांना न देणे, मागील वर्षातील तूर व हरभऱ्याचे चुकारे अद्यापही शेतकऱ्याला न मिळणे, परिणामी शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून सरसकट सुरु असलेली लूट, दुष्काळी भागातील शेतकऱ्याला तारणहार ठरणाऱ्या दुधाच्या हमी भावाची घोषणा निरुपयोगी ठरणे, मागील चार वर्षात १६ हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या रोखण्यास शासनास आलेले अपयश, शासनाच्या नियोजनशुन्य कारभारामुळे एकूण राज्याचे कृषी व पतधोरण फसल्याची शेतकऱ्याची भावना दृढ होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(बुधवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

दहा : श्री. सुनिल प्रभू, ॲड. आशिष शेलार, श्री. अजय चौधरी, ॲड पराग अळवणी, सर्वश्री सदा सरवणकर, अतुल भातखळकर, प्रताप सरनाईक, ॲड राज पुरोहित, सर्वश्री. सुनिल शिंदे, अमित साटम, प्रकाश फातर्पेकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. मंगेश कुडाळकर, सुनिल राऊत, मंगलप्रभात लोढा, रमेश लटके, संजय केळकर, तुकाराम काते, योगेश सागर, सुभाष भोईर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री रूपेश म्हात्रे, सरदार तारासिंह, प्रकाश सुर्वे, अशोक पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री. संजय पोतनीस, शांताराम मोरे, अमित घोडा, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"मुंबई शहर व उपनगरांचा सन २०१४ ते २०३४ या वीस वर्षाचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली तयार करुन मुंबई महापालिकेने राज्य शासनाकडे पाठविणे, मुंबईतील ठप्प झालेली विकास कामे सुरु होण्यासाठी विकास आराखडयास त्वरित मान्यता देण्याची आवश्यकता, शासनाच्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणांतर्गत म्हाडा वसाहतींना चार चटई क्षेत्रफळ (एफएसआय) अनुज्ञेय करण्यात येणे, जुन्या गाळेधारकांना पुनर्विकासात किमान ३५.०० चौरस मीटर चटई क्षेत्रफळ (फंजिबल शिवाय) अनुज्ञेय करण्यात येणे, फक्त भाडेकरु राहत असलेल्या इमारतीतील भाडेकरुंना ५० टक्के अधिक प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र अनुज्ञेय करणे, आशिया खंडातील सर्वात मोठया धारावी (मुंबई) येथील झोपडपट्टीच्या विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी, मुंबईतील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या तसेच निमशासकीय व खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीचा व धोकादायक इमारतीचा विकास, मुंबईतील बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास, मुंबईतील झोपडपट्टीवासियांना २६९ चौ. फूट ऐवजी ३०० चौ. फूट क्षेत्रफळाची घरे देण्याची घोषणा, मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या त्वरित दुरुस्त करण्याची आवश्यकता, पुनर्विकास प्रकल्पांमधून विकासकांनी भाडेकरुंना देण्यात येत असलेले धनादेश न वटणे, पुनर्विकासाची अनेक कामे सुरु न होणे अथवा अनेक वर्षापासून अर्धवट स्थितीत पुनर्विकास पडून असणे, महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ. फूटापर्यंच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याचा व ५०० ते ७०० चौ. फूटांच्या घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतचा ठराव मुंबई महानगरपालिकेने व ठाणे महानगरपालिकेने मंजूर करुन महापौरांच्या स्वाक्षरीने मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविणे, तथापि आयुक्तांनी या संदर्भात नगरविकास विभागाकडे आपले अभिप्राय न कळविणे, मुंबईतील काही लोकप्रतिनिधीनी नगरविकास विभागाच्या सचिवांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी लेखी निवेदन देऊन महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाला तातडीने अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्याची मागणी करणे, वांद्रे-पूर्व येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना दिलेल्या निवासस्थानांच्या जागेवर मालकी हक्काने निवासस्थाने बांधून देण्याची मागणी, राज्य शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची दिवाळीपूर्वी लागू करण्याबाबत शासनाने केलेली घोषणा, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी त्वरेने लागू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी.''

अकरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-

सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, गणपतराव देशमुख, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड यशोमती ठाकूर, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब

पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री दिपक चव्हाण, प्रदिप जाधव-नाईक, कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, ॲड. त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, विश्वजित कदम, संदिप नाईक, डॉ. मधुसूदन केंद्रे, सर्वश्री राहुल जगताप, नरहरी झिरवाळ, पंकज भुजबळ, सुरेश लाड, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मकरंद पाटील, बबनराव शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. डी.पी. सावंत, बसवराज पाटील, अमित देशमुख, ॲङ के.सी. पाडवी, श्री. सुरुपसिंह नाईक, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :

"मागील चार वर्षाच्या काळात सुमारे २.५० लाख कोटीपेक्षा अधिकचे कर्ज घेऊन देखील विविध योजना राबविण्यात शासनाला आलेले अपयश, मेक इन इंडिया व मॅग्नेटिक महाराष्ट्रच्या माध्यमातून २० लाख कोटीची गुंतवणूक आणि ५० लाख नोकऱ्या या घोषणेनुसार किती बेरोजगारांना रोजगार मिळाला यासंबंधीची अधिकृत माहिती उपलब्ध नसणे, परिणामी गरीब व गरजू व्यक्तींना कोणताही फायदा न होणे, प्रत्यक्षात विकास कामे न करता १२ हजार कोटीचा अनाठायी केलेला खर्च, बुलेट ट्रेनचा राज्याला फायदा मिळण्याची शक्यता नसताना त्याच्यासाठी सुरु असलेला आटापिटा, समृध्दी महामार्ग, बुलेट ट्रेन, मेट्रो सारखे प्रकल्प सामान्य माणसाच्या माथी मारण्याचा प्रयत्न होत असल्याचे कॅग तसेच वित्त आयोगाच्या अहवालात नमूद करणे, समृध्दी महामार्गाच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीवर टाकलेला बोजा व त्यातून कंत्राटदार, शासकीय अधिकारी व मूठभर व्यावसायिकांचे होणारे कल्याण, परिणामी इतर विभागाच्या अत्यावश्यक योजनांना लावलेली कात्री, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्याने पैशाअभावी अर्ध्यावर शिक्षण सोडण्याची आलेली वेळ, सौर ऊर्जेसाठी मोठया प्रमाणात खर्च होऊन देखील राज्यावर महागडी वीज खरेदी करण्याची आलेली वेळ, मुद्रा योजनेच्या माध्यमातून बनावट कागदपत्रांच्या आधारे २२ हजार कोटीचे कर्जवाटप केल्याचे उघडकीस येणे, तथापि कर्जाची वसुली करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि बँका यांचे कोणतेही नियंत्रण नसणे, त्यामुळे मुद्रा योजनेतून वाटप केलेल्या कर्जाबाबतची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, ठाणे महानगरपालिकेकडून विकासकांच्या हितासाठी दुसरे ठाणे निर्माण करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, त्यातच घनकचरा विभागात सुरु असलेले गैरप्रकार, ठाणे शहरातील रतनशी प्रेमजीसारख्या धर्मादाय संस्थांनी स्वत:च्या फायद्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने ठाणे शहरातील १२०० एकर जमिनीची अत्यल्प दराने केलेली विक्री, आदिवासी भागात कुपोषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून ते रोखण्यास शासनास आलेले अपयश, सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही योजना अमलात आणून १९ लाख घरे उभारण्याची केलेली घोषणा, तथापि प्रत्यक्षात केवळ १८७२ घरे उभारण्यात आल्यामुळे प्रशासनाच्या संथ गतीने योजना पूर्णत्वास येण्यास २०५० साल उजाडण्याची निर्माण झालेली स्थिती, मुंबईतील ७ मेट्रो

प्रकल्प, मोनो प्रकल्प, नागपूर व पुणे मेट्रोच्या कामाच्या संथ गतीमुळे पुढील १० वर्षातही हे काम पूर्ण होण्याची शक्यता नसणे, अनुसूचित जाती व नवबौध्द भूमिहिनांसाठी असलेल्या दादासाहेब गायकवाड योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेला विलंब, एस.टी. महामंडळाकडून मोठ्या प्रमाणावर झालेली भाडेवाढ, राज्यावरील कर्जाचा डोलारा वाढणे, दरडोई ३५ हजाराचे कर्ज असणे, शासनातील विविध विभागाची भ्रष्टाचाराची प्रकरणे पुराव्यासह उघडकीस आणूनही कारवाई करण्यात जाणीवपूर्वक होत असलेला विलंब, पोलीसांवर होणारे वाढते हल्ले तसेच अनुसूचित जाती/जमातींवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, अशा सर्वच क्षेत्रात शासन अपयशी ठरल्यामुळे राज्याची पत घसरली असून, राज्य दिवाळखोरीत जात असल्याची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.